महाराष्ट्र शासन

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**

**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/शै.वि-४/२०२४/ 3986 दिनांक : - 3 OCT 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
शासकीय,अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
पदवी व पदविका संस्था पुणे विभाग,

**विषय : सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क प्रती विद्यार्थी रू.६/-जमा करण्याबाबत.**

संदर्भ- १. संचालनालयाचे पत्र क्र.९ नियोजन/एनएसएस/२०२४/३४५ दि.२७.०९.२०२४
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/३८०० दि.१९.०९.२०२४
३. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.रासेयो-२०२२/प्र.क्र.१०१/साशि-७, दि.२२.११.२०२२
४. संचालनालयाचे पत्र क्र.०९(२)/नियोजन/NSS Unit/२०२२/३६८ दि.१२.१२.२०२२
५.संचालनालयाचे पत्र क्र.ई-फाईल क्रमांक-डीटीईएम-डी९०प्लान/७३/२०२४डेस्क-९ दि.१०.०९.२४
६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र.रासेयो-२०२४/प्र.क्र.६२/रासेयो कक्ष, दि.०५.०९.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, या विभागातील ज्या शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवि व पदविका संस्थेकरिता सन २०२४-२५ स्वयंनिर्वाहीत राष्ट्रीय सेवा योजन विद्यार्थी संख्या मंजूर करण्यांत आलेली आहे. त्या संस्थांना संदर्भ क्र.०२ च्या परिपत्रकान्वये प्रति विद्यार्थी १०/-रू. प्रमाणे शुल्क जमा करुन त्यातील ४/-रू. प्रमाणे या कार्यालयाच्या खात्यात व उर्वरित रू.६/- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या नावे जमा करण्यात यावे असे कळविण्यात आले होते.

परंतू आता संदर्भ क्र.०१ चे संचालनालयाचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रानुसार असे कळविण्यात येते की, संस्था प्रति रासेयो स्वयंसेवकांमागे रू ६/- प्रमाणे शुल्क परस्पर सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खात्यावर जमा करीत असल्यामुळे जमा होणारी रक्कम ही कोणत्या विद्यापीठ/संचालनालयाशी संबंधित आहे, हे सावित्रिबाई फुले पुणे विद्यापिठास निश्चित करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी शुल्काची रू.६/- प्रमाणे रक्कम ही परस्पर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडे जमा न करता प्रति विद्यार्थी रू.१०/- याप्रमाणे एकूण रक्कमेचा धनाकर्ष सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या नावे दि. ११.१०.२०२४ पर्यत जमा करण्यात यावा.

तसेच ज्या संस्थांनी सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क प्रती विद्यार्थी रू.६/- प्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ , पुणे यांचेकडे परस्पर जमा केले असतील त्यांनी त्याची माहिती संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र.१०.०९.२०२४ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार निधी वर्ग केलेल्या UTR क्रमांकासह या कार्यालयास माहिती सादर करण्यात यावी.(तसेच सोबत दिलेल्या गुगल फॉर्म लिंक मध्ये माहिती भरण्यात यावी.)

सोबत- गुगल फॉर्म लिंक- https://forms.gle/2A7DfivN73T4Qf8g7

**( डॉ. द. व्यं. जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४९०, ६८५९७४०९ ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,
वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : 9/नियोजन/एनएसएस/2024/ ३७५ दिनांक: 27 SEP 2024

तात्काळ/ इ-मेलद्वारे

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई /पुणे /नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय : सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क प्रती विद्यार्थी रु.६/- जमा करण्याबाबत..

संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : रासेयो-२०२२/ प्र.क्र.१०१/साशि-७, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२.

२.संचालनालयाचे पत्र क्रमांक : ९(२)/नियोजन/NSS Unit/२०२२/३६८, दिनांक : १२.१२.२०२२.

३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. रासेयो-२०२४/प्र.क्र.६२/रासेयो कक्ष, दि. ०५/०९/२०२४.

४. संचालनालयाचे पत्र क्र.DTEM-F९०PLAN/७३/२०२४-Desk-९,दि.१०/०९/२०२४.

५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. रासेयो-२०२३/प्र.क्र.१६७/साशि-७, दि. २०/०९/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन शासनाच्या संदर्भ क्रमांक-१ च्या शासन निर्णयानुसार, संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक-२ च्या पत्रान्वये आपल्या विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदविका संस्थेकरीता स्वयंनिर्वाहीत राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी संख्या मंजूर करण्यांत आलेली आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांचे नोंदणी शुल्क म्हणून प्रती विद्यार्थी रु.१०/- इतके शुल्क आकारण्याचे निर्देश आहेत त्यापैकी शासनाने संदर्भ क्रमांक-३ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रती विद्यार्थ्यामागे रु.६/- इतके शुल्क परस्पर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या नांवे जमा करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत तसेच एकत्रित अहवाल सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र.४ वरील पत्रान्वये आपणांस सूचना देण्यात आलेल्या होत्या. सदर एकत्रित अहवाल अद्यापपर्यंत संचालनालयास प्राप्त झालेला नाही.

आता शासनाने संदर्भाधिन क्र.४ वरील पत्रान्वये असे कळविले आहे की, संस्था प्रति रासेयो स्वयंसेवकांमागे रु.६/- प्रमाणे शुल्क परस्पर सावित्रिबाई फुले पुणे विद्यापिठाच्या खात्यावर जमा करीत असल्यामुळे जमा होणारी रक्कम ही कोणत्या विद्यापीठ/संचालनालयाशी संबंधित आहे, हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठास निश्चित करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी शुल्काची रु.६/- प्रमाणे रक्कम ही परस्पर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडे जमा न करता ते ज्या विद्यापिठाशी /संचालनालयाशी संलग्नित आहेत त्या विद्यापीठ/संचालनालयाकडे एकत्रित जमा करुन, संबंधित विद्यापीठ/संचालनालयांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे जमा करण्याबाबत निर्देशित केले आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदविका संस्थांकडून राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी शुल्काची रक्कम रु.६/- प्रमाणे आपल्या कार्यालयाकडे जमा करण्याबाबत संस्थाना कळविण्यात यावे, सदरहु निधी संचालनालयाकडे वर्ग करण्यासाठी आपणांस संचालनालयाचे बँक खाते उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच ज्या संस्थांनी सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क प्रती विद्यार्थी रु.६/- प्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे परस्पर जमा केले असतील तर त्याची माहिती संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. १०/०९/२०२४ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार निधी वर्ग केलेल्या UTR क्रमांकासह संचालनालयास माहिती सादर करण्यात यावी.

(श्रीकांत मडावी)
सहाय्यक संचालक (तां)
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत : संचालक /प्राचार्य सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी,पदविका व तत्सम संस्था.

मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५

**क्रमांक: रासेयो-२०२३/प्र.क्र.१६७/साशि-७** **दिनांक : २० सप्टेंबर, २०२४**

**प्रति,**
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक**
**रासेयो संलग्नित**
**सर्व विद्यापीठे/ संचालनालये**

**विषय : सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क रुपये ६/- जमा करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुलक्षून रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांकरिता आणि इतर उपक्रमांकरिता होणारा खर्च सर्व विद्यापीठाकडून नोंदणी केलेल्या प्रत्येक राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांमागे ६/- प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे (या कार्यासनाची वैयक्तिक प्रपंजी खाते नसल्यामुळे सदर निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे जमा होतो) जमा करणे बाबत आपणास कळविण्यात आलेले आहे परंतू असे निर्दशनास आले आहे की बहूतांश महाविद्यालयांकडून रुपये ६/- प्रती विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे परस्पर जमा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. प्रति रासेयो स्वयंसेवकांमागे रु. ६/- प्रमाणे महाविद्यालये शुल्क रक्कम परस्पर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खात्यावर जमा करीत असल्यामुळे जमा होणारी रक्कम ही कोणत्या विद्यापीठ/संचालनालयाशी संबधित आहे, हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास निश्चित करण्यास अडचण निर्माण होत आहे.

त्या अनुषगांने महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी शुल्काची रु.६/-प्रमाणे रक्कम ही परस्पर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडे जमा न करता ते ज्या विद्यापीठ/संचालनालयाशी संलग्नित आहेत. त्या विद्यापीठ/संचालनायाकडे एकत्रित जमा करुन, संबधित विद्यापीठ/ संचालनालयांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे जमा करण्याबाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्यात यावे व या प्रकरणी आपल्यास्तरावरुन तात्काळ उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यासनास व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना पाठविण्यात यावा.

**(डॉ. निलेश मो. पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना,